# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक: 08.04.2024** **वार: सोमवार**

---

**<u>अस्वच्छ</u>**

सार्वजनिक ठिकाणी थुंकणं, कचरा टाकणं, कचरा जाळणं आणि बांधकामाचा राडारोडा टाकून अस्वच्छता करणाऱ्या १७ हजार ७६२ जणांकडून पुणे महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागानं गेल्या तीन महिन्यांत ९० लाख ७४ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. महापालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख संदीप कदम यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली.

**<u>रक्षक</u>**

पुणे महापालिकेच्या वतीनं राज्य सुरक्षा महामंडळाकडून आणखी १०० सुरक्षा रक्षक घेतले जाणार आहेत. त्यासाठीचा प्रस्ताव सुरक्षा विभागानं तयार केला असून, तो सामान्य प्रशासन विभागाकडं पाठवण्यात आला आहे. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामं होत असून, ती पाडणं आवश्यक आहे. त्याचबरोबर रस्त्यांवर आणि पदपथावर अतिक्रमणं वाढत आहेत; वाहतूक नियोजनाच्या अनुषंगाने ती काढणं आवश्यक आहे. शहरात पाण्याच्या टाक्याही मोठ्या प्रमाणात आहेत, त्यांची सुरक्षितताही आवश्यक आहे.

**<u>मावळ</u>**

लोकसभा निवडणूकीच्या अनुषंगानं मावळ मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवडमध्ये महापालिकेच्या वतीनं विविध उपक्रम राबवले जात आहेत. आकुर्डी इथल्या श्री खंडेराया

भाजी मंडईच्या १०५ गाळेधारकांनी शंभर टक्के मतदानाची शपथ घेतली. या मंडईला रोज चार ते पाच हजार ग्राहक भेट देतात, त्यांनाही १३ मे रोजी होणा-या निवडणूकीत मतदान करण्याबाबत जागरुक करण्याचं आश्वासन यावेळी गाळेधारकांनी दिलं.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयामध्येही आज मतदान जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना मतदान करण्याचं आवाहन केलं. महापालिकेचे जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी सर्वांना मतदान करण्याबाबत शपथ दिली.

**भावैसं**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रथमच डॉक्टरांचा विचार गट निर्माण होत आहे. पुण्यासह राज्यातली भारतीय वैद्यकीय संघटनेची प्रत्येक शाखा त्यांच्या लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांपर्यंत पोहोचून आपल्या मागण्या सादर करणार आहे. उमेदवारीच्या टप्प्यापासूनच डॉक्टरांच्या मागण्यांची दखल घेणारा उमेदवार निवडून आल्यास तो डॉक्टरांवरचे हल्ले, कोरोना काळातील डॉक्टरांचे मृत्यू, त्यांनी केलेलं कार्य यासारख्या विषयांना न्याय देऊ शकेल असं संघटनेचं मत आहे.

**आप**

आम आदमी पक्ष महाराष्ट्रात लोकसभा निवडणूक लढवणार नाही असं आपचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष अजित फाटके पाटील यांनी काल पुण्यात स्पष्ट केलं. भाजपाच्या विरोधात प्रचाराची रणनीती आखण्यासाठी आय एन डी आय आघाडीच्या घटक पक्षांबरोबर चर्चा करण्यात येईल, असं फाटके पाटील यांनी सांगितलं.

**फायदा**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाच्या वतीनं देण्यात येणाऱ्या विविध सवलतींचा शहरातील साडेतीन लाख करदात्यांनी लाभ घेतला आहे. या करदात्यांना 24 कोटी 32 लाख रुपयांची कर सवलत मिळाली आहे, अशी माहिती कर संकलन विभागाचे सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी दिली.
शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, आणि अन्य अशा 6 लाख 25 हजार मालमत्ता आहेत.

**<u>झिंको</u>**

वार्षिक भांडार पडताळणीच्या कामामुळं पुण्यातील शासकीय ग्रंथागार २२ ते  २६ एप्रिलपर्यंत बंद राहणार आहे, असं शासकीय फोटोझिंको मुद्रणालयाचे प्रभारी व्यवस्थापक स. ह. केदार यांनी कळवलं आहे.

**<u>अन्नब्रह्म</u>**

प्रतिकूल परिस्थितीतही न डगमगता, संघर्ष करत, स्वतःबरोबर इतरांचाही उत्कर्ष घडवण्यासाठी कार्यरत असलेल्या अन्नब्रह्म उपासकांना काल पुण्यात दिवंगत म. वा. जोशी स्मृती गौरव अन्नब्रह्म पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. यंदाचा पुरस्कार स्मृती आठवले आणि दिलीप गानू यांना; पूना गेस्ट हाऊसचे संचालक किशोर सरपोतदार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. आयोजक आणि ज्येष्ठ लेखक, शिक्षणज्ज्ञ डॉ. न. म. जोशी यांनी अन्नब्रह्म पुरस्कारामागील भूमिका स्पष्ट केली. म. वा. जोशी अनेक वर्षे उत्तम बल्लवाचार्य म्हणून कार्यरत होते. त्यांनी बनवलेल्या रुचकर पदार्थांचं गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्यासह अनेक दिग्गजांनी भरभरून कौतुक केलं. त्यांच्या स्मृतीनिमित्त 'स्वयंपाक' हे कार्यक्षेत्र निवडून इतरांचं आयुष्य रुचकर करणाऱ्या व्यक्तींना म. वा. जोशी स्मृती गौरव अन्नब्रह्म पुरस्कार देऊन गौरविण्यात येतं, असं न म जोशी म्हणाले.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात कमाल तापमान 40 अंशांच्या आसपास असून उद्यापासून आकाश ढगाळ राहून हलक्या पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**